**Aethel Research Digest Juncture: An International Journal**
**E-ISSN: 3139-1672**
Vol. 2, Issue 1, January- February 2026
Received: 2801/2026 Revised: 07/02/2026
Accepted: 17/02/2026 Published:05/04/2026

# महाराष्ट्रातील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा मतदार समर्थनावरील परिणाम: एक अभ्यास

**प्रा. श्रीमती. बैनवाड स्वाती प्रकाश**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव, महाराष्ट्र-भारत Email- swatihargewad@gmail.com

## सारांश

भारतामध्ये सामाजिक कल्याणकारी योजनांचा सामाजिक-आर्थिक विकासात तसेच नागरिकांच्या राजकीय वर्तनावर महत्त्वपूर्ण प्रभाव पडत असल्याचे विविध संशोधनांमधून दिसून आले आहे. वेळोवेळी राज्य सरकार व केंद्र सरकार गरीब आणि वंचित गटांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी विविध योजना राबवतात. महाराष्ट्र सरकारने २०२४ मध्ये महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा रु. १५०० इतकी आर्थिक मदत थेट त्यांच्या बँक खात्यात दिली जाते.

या संशोधनाचा उद्देश या योजनेचा महिलांच्या आर्थिक स्थितीवर तसेच त्यांच्या राजकीय दृष्टिकोन आणि मतदानाच्या वर्तनावर होणारा प्रभाव अभ्यासणे हा आहे. या अभ्यासासाठी महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी भागातील 200 महिलांकडून माहिती गोळा करण्यासाठी सर्वेक्षण करण्यात आले. तसेच दुय्यम माहिती सरकारी अहवाल, संशोधन लेख आणि वृत्तपत्र स्त्रोतांमधून संकलित करण्यात आली.

सर्वेक्षणातील निष्कर्षांनुसार 94 टक्के महिलांना या योजनेबद्दल माहिती होती आणि 70 टक्के महिलांना या योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळत होता. 60 टक्के महिलांनी या योजनेमुळे सरकारबद्दल सकारात्मक भावना निर्माण झाल्याचे नमूद केले. ची-स्क्वेअर चाचणी, सहसंबंध आणि प्रतिगमन विश्लेषणाच्या निकालांवरून असे दिसून आले की, योजनेचा लाभ आणि राजकीय समर्थन यांच्यात सांख्यिकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण संबंध आहे.

या अभ्यासातून असे निष्कर्ष काढता येतात की, थेट आर्थिक लाभ देणाऱ्या योजनांचा मतदारांच्या वर्तनावर जास्त प्रभाव पडतो. तथापि मतदानाच्या निर्णयावर इतर सामाजिक आणि राजकीय घटकांचाही प्रभाव असला तरी या प्रकारच्या योजना मतदान निर्णय घेण्यावर प्रभावी परिणाम करतात.

*(**शब्दकळा:** लाडकी बहिण योजना, कल्याणकारी धोरण, महिला सक्षमीकरण, मतदार वर्तन, महाराष्ट्र)*

E-ISSN: 3139-1672

## १. प्रस्तावना:

भारत सरकार तसेच राज्य सरकार आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने अनेक कल्याणकारी योजना राबवते. अशा कल्याणकारी योजनांचा सामान्य जनतेवर सकारात्मक प्रभाव पडतो. हे सामाजिक कल्याण उपक्रम लोकांच्या दृष्टिकोनात बदल घडवून आणतात आणि त्यांच्यामध्ये एक प्रकारची खात्री व सुरक्षिततेची भावना निर्माण करतात. सरकार खरोखरच आपल्या हितासाठी काम करत करत आहे, हा दृष्टीकोन अशाच कल्याणकारी योजनेतून निर्माण होतो.

अशा कल्याणकारी योजना सुशासनाचे सर्वोत्तम पैलू दर्शवतात व सरकारविषयीची जनधारणा आणि सरकारला मिळणाऱ्या जनसमर्थनाची पातळी यांवर प्रभाव टाकतात. या कल्याणकारी कार्यक्रमांमधील तरतुदींच्या माध्यमातून, आर्थिकदृष्ट्या वंचित समुदायांना काही प्रमाणात आधार देणे शक्य होते, ज्यामुळे त्यांना राहणीमानाचा एक चांगला दर्जा प्राप्त होते. याव्यतिरिक्त, महिलांची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या उद्देशाने विविध कल्याणकारी कार्यक्रम तयार करण्यात आले आहेत. या योजनाच्या मदतीने आर्थिकदृष्ट्या वंचित महिलांना दिला जाणारा आधार व त्यांची सामाजिक प्रतिष्ठा जपण्याचे कार्य केले जाते.

याचाच एक भाग म्हणून, महाराष्ट्र शासनाने २०२४ मध्ये 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' सुरू केली. या योजनेअंतर्गत, ठराविक निकष पूर्ण करणाऱ्या महिलांना दरमहा ₹१५०० इतकी आर्थिक मदत दिली जाते. या कल्याणकारी कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आर्थिकदृष्ट्या वंचित महिलांना आर्थिक सहाय्य पुरवणे हा आहे.

त्यामुळे, हा विषय सरकारविषयी लोकांचा दृष्टिकोन आणि समर्थन यांवर सकारात्मक प्रभाव टाकू शकतो; कारण आर्थिक मदत मिळणे हे नेहमीच सरकारच्या कामकाजाविषयीच्या अधिक अनुकूल दृष्टिकोनाशी जोडलेले असते. म्हणूनच, या विषयाचे विश्लेषण अनुभवजन्य पद्धतीने केले आहे.

## २. साहित्याचा आढावा:

एडिथ जे. बॅरेट आणि फे लोमॅक्स कुक (1991) यांनी Congressional Attitudes and Voting Behavior: An Examination of Support for Social Welfare हा शोधनिबंध प्रकाशित केला. यांनी अमेरिकेतील काँग्रेस सदस्यांच्या सामाजिक कल्याणकारी धोरणांबद्दलच्या दृष्टिकोनांचा आणि त्यांच्या प्रत्यक्ष मतदानाच्या वर्तनाचा संबंध तपासला आहे. या लेखात विधिमंडळातील निर्णयप्रक्रियेत वैयक्तिक विचारधारा, राजकीय पक्षीय भूमिका आणि मतदारसंघातील सामाजिक-आर्थिक परिस्थिती यांचा प्रभाव कसा पडतो हे स्पष्ट केले आहे. या अभ्यासानुसार सामाजिक कल्याण कार्यक्रमांबद्दल सकारात्मक दृष्टिकोन असलेल्या विधिमंडळ सदस्यांनी अशा धोरणांना विधिमंडळात अधिक समर्थन दिल्याचे आढळले, तर पुराणमतवादी विचारसरणी असलेल्या सदस्यांनी तुलनेने कमी समर्थन दर्शवले.

E-ISSN: 3139-1672

संशोधनातून असेही स्पष्ट होते की केवळ पक्षीय राजकारणच नव्हे तर वैयक्तिक मूल्ये, मतदारसंघाच्या गरजा आणि सामाजिक परिस्थिती हे घटकही विधिमंडळातील मतदानाच्या निर्णयावर प्रभाव टाकतात. त्यामुळे सामाजिक कल्याण धोरणांबाबतच्या विधिमंडळातील निर्णयांचा अभ्यास करताना राजकीय विचारधारा आणि मतदारसंघाच्या हितसंबंधांचा एकत्रित प्रभाव लक्षात घेणे आवश्यक आहे.

बाएझ, जे. ई., कामाचो, ए., कोनोव्हर, ई., आणि झाराटे, आर. ए. (२०१२) यांनी केलेल्या अभ्यासात सामाजिक कल्याण योजनांचा राजकीय सहभाग आणि मतदानाच्या वर्तनावर होणारा परिणाम तपासला आहे. या संशोधनात कोलंबियातील 'फॅमिलियास एन अक्सिऑन या सशर्त रोख हस्तांतरण कार्यक्रमाचा मतदार नोंदणी, मतदानातील सहभाग आणि राजकीय पसंतीवर होणारा प्रभाव विश्लेषित केला आहे. या अभ्यासात असे आढळले की, या योजनेचे लाभार्थी मतदार म्हणून नोंदणी करण्याची आणि निवडणुकांमध्ये मतदान करण्याची शक्यता जास्त होती. विशेषतः महिलांमध्ये मतदानाचा सहभाग वाढल्याचे दिसून आले, कारण त्या या योजनेच्या मुख्य लाभार्थी होत्या. तसेच या योजनेचा लाभ घेणाऱ्या मतदारांनी सत्ताधारी पक्षाला अधिक समर्थन दिल्याचेही दिसून आले. या निष्कर्षांवरून असे सूचित होते की सरकारकडून दिल्या जाणाऱ्या आर्थिक सहाय्याच्या योजनांमुळे नागरिकांचा राजकीय सहभाग वाढू शकतो आणि त्या योजनांचा निवडणूक परिणामांवरही प्रभाव पडू शकतो.

समंथा आणि चक्रवर्ती (२०२६) यांच्या **"Gender and Populism: How Do Welfare Schemes Influence the Voting Behaviour of Women in Contemporary West Bengal?"** या अभ्यासात यांनी पश्चिम बंगालमधील महिलांच्या मतदानाच्या वर्तनावर कल्याणकारी योजनांचा प्रभाव तपासला आहे. या संशोधनात गुणात्मक पद्धतीचा वापर करून, महिलांच्या मुलाखती घेण्यात आल्या आणि त्यांचे विश्लेषण थीमॅटिक कोडिंगद्वारे करण्यात आले. या अभ्यासात त्यांना असे आढळले की, राज्य सरकारकडून राबविल्या जाणाऱ्या विविध सामाजिक कल्याण योजनांविषयी अधिक जागरूकता व माहिती होती, तर केंद्र सरकारच्या योजनांविषयी कमी माहिती व कमी जागरूकता होती. या योजनांमुळे महिलांमध्ये आर्थिक व सामाजिक सशक्तीकरणाची भावना निर्माण झाली असून, त्यांनी या योजनांना त्यांच्या घरगुती आणि अवैतनिक श्रमांची मान्यता म्हणून पाहिले. परिणामी, या प्रकारच्या योजनामुळे महिलांच्या मतदान निर्णयावर परिणाम होऊन, लाभ मिळालेल्या योजनांच्या आधारे 'पूर्वलक्षी मतदान' म्हणजे मागील अनुभवांच्या आधारे मतदान करण्याची प्रवृत्ती दिसून येते. त्यामुळे लोकलाडावणी कल्याणकारी धोरणे महिलांच्या राजकीय पसंती व मतदानाच्या वर्तनावर महत्त्वपूर्ण प्रभाव टाकू शकतात, असे या अभ्यासातून स्पष्ट होते.

डॉ.विशाल विष्णू आंबेडकर-ओव्हाळ आणि डॉ.राणी शिंदे (२०२५) यांनी "महाराष्ट्रातील महिलांवर मुख्यमंत्री माझी लाडकी बहिन योजनेचा प्रभाव: एक विश्लेषणात्मक या विषयावर अभ्यास केला. या

E-ISSN: 3139-1672

संशोधनात महाराष्ट्रातील महिलांवर या योजनेचा सामाजिक व आर्थिक परिणाम अभ्यासला आहे. या अभ्यासात राज्यातील विविध विभागांमधील सुमारे 500 महिला लाभार्थ्यांचा सर्वेक्षणाद्वारे अभ्यास करण्यात आला. संशोधनात रोजगाराच्या संधी, उत्पन्ननिर्मिती, उद्योजकता, आर्थिक नियोजन, आरोग्य जागरूकता आणि सामाजिक सहभाग या घटकांचा विचार करण्यात आला. निष्कर्षानुसार या योजनेमुळे महिलांच्या आत्मविश्वासात वाढ झाली, कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढला आणि शिक्षण व आरोग्याविषयी जागरूकता सुधारली. बहुसंख्य महिलांनी या योजनेबद्दल सकारात्मक मत व्यक्त केले असून सुमारे 67% महिलांनी या योजनेचा त्यांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम झाल्याचे सांगितले. तथापि, काही क्षेत्रांमध्ये त्वरित आर्थिक लाभ किंवा कर्जसुविधा मिळण्यात मर्यादा असल्याचेही दिसून आले. एकूणच, या योजनेमुळे महिलांचे सामाजिक-आर्थिक सशक्तीकरण वाढण्यास मदत झाली असून भविष्यात तिची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यासाठी सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते.

देशपांडे, टिलिन आणि कैलास (2019) यांनी "भाजपच्या कल्याणकारी योजना: 2019 च्या निवडणुकीत याचा काही फरक घडवला का?" या विषयावर अभ्यास केला. यांनी या अभ्यासात भारतातील 2019 लोकसभा निवडणुकांमध्ये कल्याणकारी योजनांचा मतदारांच्या वर्तनावर झालेला प्रभाव तपासला आहे. या संशोधनात **NES (National Election Study) 2019 post-poll survey** मधील आकडेवारीचा वापर करून, विविध सरकारी योजनांचे लाभार्थी आणि त्यांचे मतदानाचे कल यांचे विश्लेषण करण्यात आले. अभ्यासानुसार मतदारांनी पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात कल्याणकारी योजनांचे श्रेय राज्य सरकार किंवा स्थानिक प्रतिनिधींपेक्षा केंद्र सरकारला दिले असल्याचे दिसून आले. विशेषतः **उज्ज्वला योजना, जनधन योजना आणि आवास योजना** यांसारख्या योजनांचे लाभार्थी भाजपला मतदान करण्याची शक्यता अधिक असल्याचे काही प्रमाणात आढळले, **तर पेन्शन योजना किंवा MGNREGA** सारख्या योजनांच्या लाभार्थ्यांमध्ये हा प्रभाव कमी दिसून आला. या निष्कर्षांवरून असे सूचित होते की, कल्याणकारी योजनांमुळे मतदारांच्या राजकीय निर्णयांवर काही प्रमाणात प्रभाव पडतो; मात्र निवडणुकीतील मतदानाचे वर्तन हे केवळ कल्याणकारी योजनांवर अवलंबून नसून इतर राजकीय, सामाजिक आणि नेतृत्वाशी संबंधित घटकही महत्त्वाची भूमिका बजावतात.

या सर्व संशोधनांवरून असे दिसून येते की कल्याणकारी योजनांचा मतदारांच्या वर्तनावर काही प्रमाणात प्रभाव असू शकतो.

## ३. अभ्यासाची उद्दिष्टे:

अ. लाडकी बहिण योजनेबद्दल महिलांमध्ये असलेली जागरूकता तपासणे.

आ. या योजनेचा महिलांच्या आर्थिक स्थितीवर होणारा परिणाम अभ्यासणे.

E-ISSN: 3139-1672

इ. या योजनेचा मतदानाच्या वर्तनावर होणारा प्रभाव तपासणे.

ई. या योजनेमुळे सरकारबद्दल सकारात्मक समर्थन वाढते का हे विश्लेषित करणे.

## ४. अभ्यासाची परिकल्पना

१. H1 – लाडकी बहिण योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांमध्ये सत्ताधारी सरकारबद्दल सकारात्मक समर्थन अधिक असते.

२. H2 – या योजनेबद्दल जागरूक असलेल्या महिलांमध्ये सरकारविषयी सकारात्मक धारणा अधिक असते.

३. H3 – आर्थिक लाभ मिळाल्यामुळे महिलांची राजकीय सहभागिता वाढते.

**५. संशोधन पद्धती:** या संशोधनात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा मतदार समर्थनावर होणारा परिणाम आणि मतदाराचे वर्तन याचा अभ्यास करण्यासाठी अनुभवाधारित संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**माहितीचे संग्रहण:** सदरील संशोधनात २०० महिलांकडून गूगल फॉर्म प्रश्नावली द्वारे माहिती गोळा केली आहे. याद्वारे या योजनेबाबत त्याची मते व मतदान समर्थनावर झालेला परिणाम याचे विश्लेल्षण करण्यात आले आहेत.

**नमुना निवड:** या अभ्यासात ग्रामीण व शहरी भागातील महिलांची निवड सोयीच्या पद्धतीने करण्यात आली आहे. यांच्याकडून माहिती गोळा करून त्याचे विश्लेषण व अर्थबोधन करण्यात आले आहे.

**माहितीचे विश्लेषण:** प्रश्नावली द्वारे गोळा करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी टक्केवारी, संखीकीय विश्लाषण, ची-स्क्वेअर चाचणी, सहसंबंध आणि प्रतिगमन विश्लेषण याचा वापर करण्यात आला आहे.

## ६. योजनाबाबत महिलांची मते:

या अभ्यासात महाराष्ट्रातील २०० महिलांच्या सर्वेक्षणावर आधारित माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. या विश्लेषणातून लाडकी बहिण योजनेबद्दलची जागरूकता, आर्थिक परिणाम, महिलांचे सक्षमीकरण आणि राजकीय धारणा यांचा अभ्यास करण्यात आला. खालीली तक्ता ०१ मध्ये विविध घटकाचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**तक्ता ०१: २०० महिलांची मते**

| नमुना प्रतिसाद | प्रतिवादी | प्रमाण |
|---|---|---|
| **वयोगट** | | |
| 18-25 | 35 | 17.50% |
| 26-35 | 68 | 34.00% |
| 36-45 | 60 | 30.00% |

E-ISSN: 3139-1672

| | | |
|---|---|---|
| 46-60 | 30 | 15.00% |
| 60+ | 07 | 03.50% |
| **शिक्षणाचा स्तर** | | |
| प्राथमिक | 52 | 26.00% |
| माध्यमिक | 75 | 38.50% |
| उच्च माध्यमिक | 39 | 19.50% |
| पदवीधर | 25 | 13.00% |
| पदव्युत्तर | 09 | 04.50% |
| **निवासी क्षेत्र** | | |
| ग्रामीण | 110 | 55% |
| शहरी | 90 | 45% |
| योजनेविषयीची जागृती | | |
| जागृत | 188 | 94% |
| अजागृत | 12 | 6% |
| योजनेचे लाभार्थी | | |
| लाभार्थी | 140 | 70% |
| लाभार्थी नसलेले | 60 | 30% |
| आर्थिक स्थितीत सुधारणा | | |
| हो | 120 | 60.00% |
| नाही | 55 | 27.50% |
| निश्चित नाही | 25 | 12.50% |
| **कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग** | | |
| वाढ झाली | 105 | 52.50% |
| कोणताही बदल नाही | 55 | 27.50% |
| निश्चित सांगता येत नाही | 40 | 20.00% |
| **सरकारविषयी सकारात्मक दृष्टिकोन** | | |
| होय | 120 | 60% |
| नाही | 60 | 30% |
| निश्चित सांगता येत नाही | 20 | 10% |
| 200 | | |
| **मतदानाच्या निर्णयावर परिणाम** | | |
| होय | 85 | 42.50% |
| नाही | 70 | 35.00% |
| निश्चित सांगता येत नाही | 45 | 22.50% |

वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की, सर्वाधिक प्रतिसादक २६-३० वयोगटातील (३४%) आहेत. त्याखालोखाल ३६-४५ वयोगटातील (३०%) आहेत. या दोन वयोगटातील प्रतिसादक आर्थिकदृष्ट्या सक्रिय आणि सामाजिकदृष्ट्या जागरूक असल्यामुळे सरकारी योजनांचा प्रभाव या गटावर जास्त असू शकतो. शिक्षणाचा विचार केला असता, सर्वाधिक महिलांचे शिक्षण माध्यमिक (३८%) स्थरावरील आहे. त्याखालोखाल २६% महिलांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण केले आहे. यावरूळ लक्षात येते कि, योजनेच्या जागरूकता हि शिक्षण पातळीवर थोडीफार अवलंबून आहे. परंतु राजकीय पक्ष्याद्वारे करण्यात येणारे मौखिक प्रचार आणि प्रसार हा योजनेच्या जागरूकता व मतदारावर प्रभाव टाकणारा सर्वात महत्वाचा

E-ISSN: 3139-1672

घटक आहे. त्याचबरोबर, सर्वेक्षणातील ५५% महिला ग्रामीण आणि ४५% महिला या शहरी भागातील आहेत. त्यामुळे या अभ्यासातून ग्रामीण भागातील महिलांवर योजनेचा प्रभाव अधिक स्पष्टपणे दिसून येतो.

**योजनेविषयी जागृती:** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा विचार केला असता, जवळपास सर्वच म्हणजे ९४% महिलांना योजनेबद्दल माहिती आहे आणि फक्त ६% महिलाना योजनेबाबत माहिती नाही. यावरून लक्षात येते कि, जर एखादी योजना विशिष्ट गटातील मतदार समर्थनासाठी वापरली जातो, तेव्हा त्या योजनांची माहिती मोठ्या प्रमाणावर नागरिकांपर्यंत पोहोचवली जाते.

**योजनेचे लाभार्थी:** सर्वेक्षणातील ७०% महिलांना योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळत आहे. त्यामुळे या योजनेचा सामाजिक प्रभाव मोठ्या प्रमाणावर दिसून येतो.

**आर्थिक परिणाम आणि सामाजिक सक्षमीकरण:** या योजनेमुळे ६०% महिलांनी आर्थिक स्थितीत सुधारणा झाल्याचे सांगितले आहे. यावरून या योजनेमुळे महिलांना आर्थिक आधार मिळत असल्याचे दिसते. त्याच बरोबर ५२.5% महिलांनी कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढल्याचे सांगितले. त्यामुळे या योजनेमुळे महिलांचे सामाजिक सक्षमीकरण होत असल्याचे दिसते.

**राजकीय धारणा:** वरील आकडेवारी नुसार, सरकारबद्दल सकारात्मक भावना निर्माण करण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा परिणाम झाला आहे असे स्पष्ट होते. ६०% महिलांनी मान्य केले आहे कि, या योजनेमुळे त्यांची सरकारबद्दल सकारात्मक भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे कल्याणकारी योजनांचा राजकीय धारणा तयार करण्यात खूप मोठ्या प्रमाणात प्रभाव पडतो.

**मतदान वर्तन:** ४२.५०% महिलांनी या योजनेचा मतदानाच्या निर्णयावर प्रभाव पडल्याचे सांगितले. तथापि ३५% महिलांनी मतदानाच्या निर्णयावर कोणताही प्रभाव नसल्याचे सांगितले. त्यामुळे मतदारांचे निर्णय अनेक घटकांवर अवलंबून असल्याचे दिसून येते.

## ७. गृहितक चाचणी आणि सांख्यिकीय विश्लेषण

या अभ्यासात महिलांच्या आर्थिक सक्षमीकरण आणि राजकीय धारणा यांच्यातील संबंध तपासण्यासाठी सांख्यिकीय पद्धतींचा वापर करण्यात आला आहे. प्रामुख्याने वर्णनात्मक सांख्यिकी, क्रॉस-टॅब्युलेशन, काय-स्केअर चाचणी, सहसंबंध विश्लेषण आणि प्रतिगमन विश्लेषण या तंत्रांचा उपयोग करण्यात आला आहे. 200 प्रतिसादकांच्या माहितीवर आधारित निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

### ७.१. वर्णनात्मक सांख्यिकी विश्लेषण

प्राथमिक विश्लेषणात असे आढळून आले की, नमुन्यातील 94 टक्के महिलांना योजनेबद्दल माहिती आहे, तर 70% महिला या योजनेच्या लाभार्थी आहेत. यावरून या योजनेचा व्यापक प्रसार आणि अंमलबजावणी प्रभावी असल्याचे दिसून येते.

E-ISSN: 3139-1672

आर्थिक परिणामाच्या दृष्टीने पाहता 60% महिलांनी त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाल्याचे नमूद केले आहे. याशिवाय 52.5% महिलांनी कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढल्याचे सांगितले. हे निष्कर्ष सूचित करतात की, आर्थिक मदतीमुळे महिलांच्या सामाजिक सक्षमीकरणातही वाढ झाली आहे. राजकीय दृष्टिकोनाच्या बाबतीत, 60% महिलांनी सरकारबद्दल सकारात्मक भावना व्यक्त केल्या, तर 42.5% महिलांनी या योजनेचा त्यांच्या मतदानाच्या निर्णयावर प्रभाव पडल्याचे सांगितले. तथापि काही महिलांनी कोणताही प्रभाव नसल्याचे नमूद केले, ज्यावरून मतदानाचे निर्णय बहुआयामी घटकांवर आधारित असल्याचे स्पष्ट होते.

### ७.२. लाभार्थी स्थिती आणि सरकारबद्दल सकारात्मक धारणा (H1):

या अभ्यासात लाडकी बहिण योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांमध्ये सरकारबद्दल सकारात्मक समर्थन अधिक आहे का हे तपासण्यासाठी काय-वर्ग चाचणी वापरण्यात आली आहे. लाभार्थी स्थिती आणि सरकारबद्दलची सकारात्मक धारणा यांच्यातील संबंध तपासण्यासाठी क्रॉस-तक्ता विश्लेषण करण्यात आले आहे.

गृहीतक

**$H1_0$ (शून्य गृहीतक):** लाडकी बहिण योजनेचा लाभ आणि सरकारबद्दल सकारात्मक धारणा यांच्यात कोणताही सांख्यिकीय संबंध नाही.

**$H1_1$ (पर्यायी गृहीतक):** लाडकी बहिण योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांमध्ये सरकारबद्दल सकारात्मक समर्थन अधिक आहे.

**तक्ता ०२: लाभार्थी स्थिती आणि सरकारबद्दल सकारात्मक धारणा विश्लेषण**

| श्रेणी | सकारात्मक | नकारात्मक/तटस्थ | एकूण लाभार्थी |
|---|---|---|---|
| लाभार्थी | 95 | 45 | 140 |
| गैर-लाभार्थी | 25 | 35 | 60 |
| एकूण | 120 | 80 | 200 |

वरील तक्त्यात दिसून येते की, लाभार्थी महिलांपैकी 95 महिलांनी सरकारबद्दल सकारात्मक धारणा व्यक्त केली आहे, तर 45 महिलांनी नकारात्मक किंवा तटस्थ मत व्यक्त केले आहे. याउलट गैर-लाभार्थी महिलांमध्ये सकारात्मक धारणा तुलनेने कमी प्रमाणात दिसून येते.

**तक्ता ०३: काय-वर्ग चाचणीचे निष्कर्ष**

| चाचणी सांख्यिकी | मूल्य |
|---|---|
| काय-वर्ग ($\chi^2$) मूल्य | 12.02 |
| स्वातंत्र्य कोटी (df) | 1 |
| सार्थकता पातळी | 0.05 |
| क्रांतिक मूल्य | 3.84 |

E-ISSN: 3139-1672

काय-वर्ग चाचणीच्या निकालानुसार $\chi^2$ मूल्य **12.02** आढळले आहे, जे 0.05 या महत्त्वाच्या स्तरावरील क्रांतिक मूल्य (critical value-3.84) पेक्षा जास्त आहे. त्यामुळे $H1_0$ नाकारली जाते **आणि** पर्यायी परिकल्पना ($H1_1$) स्वीकारली जाते**.**

या निष्कर्षावरून असे स्पष्ट होते की, लाभार्थी स्थिती आणि सरकारबद्दल सकारात्मक धारणा यांच्यात सांख्यिकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण संबंध आहे**.** म्हणजेच, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांमध्ये सरकारबद्दल सकारात्मक समर्थन अधिक प्रमाणात आढळते.

या विश्लेषणावरून असे सूचित होते की, थेट आर्थिक सहाय्य देणाऱ्या कल्याणकारी योजनांचा नागरिकांच्या राजकीय धारणा आणि समर्थनावर काही प्रमाणात प्रभाव पडू शकतो.

**७.३. योजनेची जागरूकता आणि राजकीय समर्थन (H2)**

योजनेची माहिती किंवा जागरूकता आणि सरकारबद्दलची राजकीय धारणा यांच्यातील कार्यात्मक संबंध तपासण्यासाठी साधे रेषीय प्रतिगमन विश्लेषण करण्यात आले आहे. यामध्ये 'जागरूकता' हा स्वतंत्र चल असून 'राजकीय समर्थन' हा अवलंबित चल आहे.

**$H2_0$ (शून्य गृहीतक):** "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबद्दल जागरूकता आणि राजकीय धारणा यात कोणताही संबंध नाही."

**$H2_1$ (पर्यायी गृहीतक):** "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबद्दल जागरूकता आणि राजकीय धारणा यात सकारात्मक संबंध आहे."

प्रतिगमन विश्लेषणातून प्राप्त झालेले निष्कर्ष खालील तक्त्यामध्ये दर्शविले आहेत:

**तक्ता क्र. ०४: जागरूकता आणि राजकीय धारणा**

| चल | सहगुणक (B) | प्रमाण त्रुटी | t-मूल्य | सार्थकता (p-मूल्य) |
|---|---|---|---|---|
| सातत्यपूर्ण | 1.45 | 0.22 | 6.59 | 0 |
| योजना-जागृती | **0.31** | **0.09** | **3.12** | **0.002** |

तक्ता क्र. ०४ नुसार, योजनेच्या जागरूकतेचा सहगुणक (B) ०.३१ आहे. याचा अर्थ असा की, जेव्हा महिलांच्या योजनेबद्दलच्या जागरूकतेत एक एककाने वाढ होते, तेव्हा त्यांच्या सरकारबद्दलच्या सकारात्मक धारणेमध्ये सरासरी ०.३१ एककाने वाढ होते. हा सकारात्मक गुणांक दोन्ही चलांमधील थेट संबंध दर्शवतो.

या मॉडेलमध्ये t-मूल्य ३.१२ आहे आणि संबंधित p-मूल्य ०.००२ आहे. सांख्यिकीय नियमानुसार, जर p-मूल्य ०.०५ पेक्षा कमी असेल, तर तो घटक महत्त्वपूर्ण मानला जातो. येथे $0.002 < 0.05$ असल्याने, 'जागरूकता' हा घटक राजकीय समर्थन ठरवण्यात अत्यंत प्रभावी असल्याचे सिद्ध होते.

प्रस्तुत सांख्यिकीय पुराव्यांच्या आधारे असे दिसून येते की, ज्या महिलांना योजनेचे उद्दिष्ट, पात्रता आणि लाभ मिळवण्याची प्रक्रिया याबद्दल सखोल माहिती आहे, त्यांच्यामध्ये सरकारप्रती विश्वासाची भावना अधिक प्रबळ आहे. माहितीचा अभाव अनेकदा संभ्रम निर्माण करतो, परंतु स्पष्ट जागरूकता सकारात्मक राजकीय प्रतिमेस पोषक ठरते. वरील विश्लेषणावरून हे स्पष्ट होते की, जागरूकता आणि राजकीय धारणा यामध्ये सांख्यिकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण आणि सकारात्मक संबंध आहे. परिणामी, संशोधकाद्वारे मांडलेले गृहीतक २ (H2) स्वीकारले जाते.

**७.४. आर्थिक सुधारणा आणि महिला सक्षमीकरण (H3)**

महिलांच्या आर्थिक स्थितीत झालेली सुधारणा आणि त्यांचा कुटुंबातील निर्णय प्रक्रियेतील सहभाग यांच्यातील संबंधाची तीव्रता तपासण्यासाठी 'पियरसन सहसंबंध गुणांक' (r) वापरण्यात आला आहे.

**$H3_0$ (शून्य गृहीतक):** योजनेमुळे महिलांच्या आर्थिक स्थितीत कोणतीही सुधारणा होत नाही आणि निर्णय प्रक्रियेतील सहभागावर कोणताही परिणाम होत नाही.

**$H3_1$ (पर्यायी गृहीतक):** योजनेमुळे महिलांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होऊन त्यांचा कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढतो.

**तक्ता ०५: सहसंबंध विश्लेषण – आर्थिक सुधारणा आणि महिला सक्षमीकरण**

| चल | सहसंबंध गुणांक (r) | सांख्यिकीय सार्थकता (p-value) |
|---|---|---|
| आर्थिक सुधारणा (X)<br>महिला सक्षमीकरण (Y) | 0.52 | 0.004 |

संशोधनातून प्राप्त झालेला सहसंबंध गुणांक (r = 0.52) हा दर्शवतो की, आर्थिक सुधारणा आणि निर्णय प्रक्रियेतील सहभाग यांच्यात सकारात्मक आणि मजबूत संबंध आहे. याचा अर्थ, जशी महिलांच्या आर्थिक स्वावलंबनात भर पडते, तसाच त्यांचा घरातील आर्थिक व्यवहार, शिक्षण, आरोग्य आणि बचतीशी संबंधित निर्णयांमध्ये सहभाग वाढतो.

येथे सांख्यिकीय सार्थकता **(**p-value-0.004) हे 0.05 पेक्षा कमी असते, तेव्हा हे स्पष्ट करते की, हा सहसंबंध योगायोग नसून सांख्यिकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण आहे.

आर्थिक लाभ हस्तांतरणामुळे (DBT) महिलांना केवळ रोख रक्कमच मिळत नाही, तर त्या रकमेच्या विनियोगावर त्यांचा ताबा राहतो, ज्यामुळे त्यांचे कुटुंबातील स्थान उंचावते. सांख्यिकीय पुराव्यांच्या आधारे, **$H3_1$** हे गृहीतक स्वीकारले जाते.

वरील निष्कर्षांवरून हे स्पष्ट होते की, 'लाडकी बहीण' योजनेचा आर्थिक लाभ हा महिला सक्षमीकरणाचा एक उत्प्रेरक ठरला आहे. आर्थिक सुधारणांमुळे महिलांचा कुटुंबातील आवाज अधिक प्रभावी झाला

E-ISSN: 3139-1672

असून, त्यांचे सामाजिक स्थान अधिक बळकट झाले आहे. अशा प्रकारे, H3 हे गृहीतक सांख्यिकीय पुराव्यांच्या आधारे पूर्णपणे सिद्ध होते.

## ८. लाडकी बहिण योजनेचे निरीक्षणे:

या अभ्यासाचा मुख्य उद्देश लाडकी बहिण योजनेचा महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणावर तसेच त्यांच्या राजकीय धारणा आणि मतदानाच्या वर्तनावर होणारा प्रभाव तपासणे हा होता. सर्वेक्षणातून मिळालेल्या आकडेवारीच्या विश्लेषणावरून काही महत्त्वपूर्ण निरीक्षणे समोर आली आहेत.

सर्वप्रथम, योजनेबद्दलची जागरूकता अत्यंत उच्च स्तरावर असल्याचे दिसून आले. सर्वेक्षणातील 94 टक्के महिलांना या योजनेबद्दल माहिती असल्यामुळे सरकारी योजनांची माहिती नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचत असल्याचे सूचित होते. जागरूकता आणि राजकीय धारणा यांच्यातील सकारात्मक संबंध या अभ्यासातून स्पष्ट झाला आहे. यावरून असे दिसते की, नागरिकांना योजनांची माहिती मिळाल्यास त्यांच्या सरकारबद्दलच्या धारणा बदलण्याची शक्यता वाढते.

दुसरे महत्त्वाचे निरीक्षण म्हणजे, योजनेचा आर्थिक परिणाम होय. सर्वेक्षणातील 60 टक्के महिलांनी त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाल्याचे नमूद केले आहे. नियमित आर्थिक सहाय्यामुळे घरगुती खर्च, मुलांचे शिक्षण आणि आरोग्य सेवांसाठी आर्थिक मदत मिळत असल्याचे अनेक प्रतिसादकांनी सांगितले आहे. यामुळे महिलांना आर्थिक सुरक्षिततेची भावना निर्माण होते आणि त्यांच्या आर्थिक स्वावलंबनात काही प्रमाणात वाढ होते.

तिसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे महिलांचे सामाजिक सक्षमीकरण होय. सर्वेक्षणानुसार 52.5 टक्के महिलांनी कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढल्याचे नमूद केले आहे. आर्थिक संसाधनांवर काही प्रमाणात नियंत्रण मिळाल्यामुळे महिलांची कुटुंबातील भूमिका अधिक मजबूत होते. त्यामुळे आर्थिक सहाय्य योजना केवळ आर्थिक मदत देत नाहीत, तर सामाजिक सक्षमीकरणालाही चालना देतात.

राजकीय धारणा आणि मतदानाच्या वर्तनाच्या दृष्टीने पाहता 60 टक्के महिलांनी सरकारबद्दल सकारात्मक भावना व्यक्त केल्या आहेत. तथापि मतदानाच्या निर्णयावर या योजनेचा प्रभाव मर्यादित असल्याचे दिसून आले. सुमारे 42.5 टक्के महिलांनी मतदानाच्या निर्णयावर या योजनेचा प्रभाव पडल्याचे सांगितले आहे, तर काही महिलांनी कोणताही प्रभाव नसल्याचे नमूद केले आहे. यावरून असे दिसते की, मतदारांचे निर्णय केवळ एका योजनेवर आधारित नसतात. त्यावर सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि वैयक्तिक घटकांचा एकत्रित प्रभाव असतो.

परीकाल्पानांची चाचणी आणि सांख्यिकीय विश्लेषणातून देखील या निष्कर्षांना समर्थन मिळाले आहे. लाभार्थी स्थिती, जागरूकता आणि आर्थिक सुधारणा हे घटक राजकीय समर्थनावर सकारात्मक प्रभाव

E-ISSN: 3139-1672

टाकतात. प्रामुख्याने योजनेचा प्रत्यक्ष लाभ घेणाऱ्या महिलांमध्ये सरकारबद्दल सकारात्मक धारणा अधिक प्रमाणात दिसून येतात.

सर्वसाधारणपणे या अभ्यासातून असे दिसून येते की, लाडकी बहिण योजना ही महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी उपयुक्त ठरत आहे आणि काही प्रमाणात सरकारबद्दल सकारात्मक राजकीय धारणा निर्माण करण्यास मदत करत आहे. तथापि मतदानाच्या अंतिम निर्णयावर अनेक घटकांचा प्रभाव असल्यामुळे कल्याणकारी योजनांचा परिणाम मर्यादित स्वरूपाचा असतो.

## ९. महत्त्वाची निरीक्षणे व निष्कर्ष

या अभ्यासातून पुढील महत्त्वपूर्ण निष्कर्ष समोर आले आहेत:

- **योजनेबद्दल उच्च स्तरावरील जागरूकता:** सर्वेक्षणातील 94 टक्के महिलांना लाडकी बहिण योजनेबद्दल माहिती असल्याचे आढळले. यावरून सरकारी योजनांची माहिती विशेषता लाडकी बहिण योजनेचा नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचत असल्याचे दिसून येते.
- **लाभार्थ्यांचे मोठे प्रमाण:** नमुन्यातील 70 टक्के महिला या योजनेच्या लाभार्थी असल्याचे दिसून आले. त्यामुळे या योजनेचा सामाजिक स्तरावर व्यापक प्रभाव आहे हे स्पष्ट होते.
- **आर्थिक स्थितीत सुधारणा:** सर्वेक्षणातील 60 टक्के महिलांनी या योजनेमुळे त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाल्याचे नमूद केले. यावरून लक्ष्यात येते कि, या प्रकारच्या योजना महिला सक्षमीकरणासाठी महत्वाच्या भूमिका पार पडतात.
- **महिलांच्या सामाजिक सक्षमीकरणात वाढ:** सुमारे 52.5 टक्के महिलांनी कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढल्याचे सांगितले आहे. यावरून आर्थिक सहाय्यामुळे महिलांचे सामाजिक सक्षमीकरण वाढण्यास मदत होत असल्याचे दिसते.
- **सरकारबद्दल सकारात्मक धारणा:** 60 टक्के महिलांनी सरकारबद्दल सकारात्मक भावना व्यक्त केल्या आहेत. यावरून कल्याणकारी योजनांचा नागरिकांच्या राजकीय धारणा तयार करण्यात मोठा प्रभाव असू शकतो.
- **मतदानाच्या वर्तनावर मर्यादित प्रभाव:** सुमारे 42.5 टक्के महिलांनी या योजनेचा मतदानाच्या निर्णयावर प्रभाव पडल्याचे सांगितले, तर काही महिलांनी कोणताही प्रभाव नसल्याचे नमूद केले.
- **आर्थिक लाभ आणि राजकीय समर्थन यांच्यात संबंध:** सांख्यिकीय विश्लेषणानुसार लाभार्थी स्थिती आणि राजकीय समर्थन यांच्यात सकारात्मक संबंध आढळला.

### निष्कर्ष

या अभ्यासाचा उद्देश लाडकी बहिण योजनेचा महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणावर आणि त्यांच्या राजकीय धारणा व मतदानाच्या वर्तनावर होणारा प्रभाव तपासणे हा होता. सर्वेक्षणातील आकडेवारी

E-ISSN: 3139-1672

आणि सांख्यिकीय विश्लेषणावरून असे दिसून आले की, या योजनेमुळे महिलांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाली आहे आणि त्यांच्या सामाजिक सहभागात वाढ झाली आहे.

याशिवाय या योजनेमुळे महिलांमध्ये सरकारबद्दल सकारात्मक धारणा निर्माण झाल्याचेही दिसून आले. तथापि मतदानाच्या अंतिम निर्णयावर अनेक सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घटकांचा प्रभाव असल्यामुळे कल्याणकारी योजनांचा प्रभाव मर्यादित स्वरूपाचा असतो.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी महत्त्वाची ठरू शकते. भविष्यात अशा योजनांचे व्यापक आणि दीर्घकालीन परिणाम समजून घेण्यासाठी अधिक व्यापक आणि सखोल संशोधन करणे आवश्यक आहे.

## संदर्भ ग्रंथाची यादी


१. Barrett, Edith J., and Fay Lomax Cook. "Congressional attitudes and voting behavior: An examination of support for social welfare." *Legislative Studies Quarterly* (1991): 375-392.

२. Baez, Javier, et al. "Conditional cash transfers, political participation, and voting behavior." (2012).

३. Goyal, Ankush, and Rajender Kumar. "Does social welfare programmes influence households trust in local administration and their political participation? Evidence from the MGNREG scheme in India." *Indian Journal of Human Development* 16.3 (2022): 602-617.

४. Samanta, Suteertha, and Aritra Chakraborty. "Gender and Populism: How Do Welfare Schemes Influence the Voting Behaviour of Women in Contemporary West Bengal?." *Journal of South Asian Development* (2026): 09731741261418383.

५. Ambedkar_Ovhal, Vishal Vishnu, and Rani Shinde. "Impact of mukhyamantri mazi ladki bahin yojana on women in Maharashtra: An analytical study." *International Journal of Management (IJM)* 16.1 (2025).

६. Deshpande, Rajeshwari, Louise Tillin, and K. K. Kailash. "The BJP's welfare schemes: Did they make a difference in the 2019 elections?." *Studies in Indian Politics* 7.2 (2019): 219-233.

E-ISSN: 3139-1672

७. Maitra, Pushkar, et al. *Declining Clientelism of Welfare Benefits? Targeting and Political Competition Based Evidence from an Indian State*. No. w32157. National Bureau of Economic Research, 2024.

८. Bardhan, Pranab, et al. "How do voters respond to welfare vis-à-vis public good programs? Theory and evidence of political clientelism." *Quantitative Economics* 15.3 (2024): 655-697.

९. https://ladakibahin.maharashtra.gov.in/

१०. https://pune.gov.in/en/scheme/mukhyamantri-majhi-ladki-bahin-yojana/